# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.03.2026** **वार- रविवार**

---

**विमानसेवा बंद**

अमेरिका-इस्त्राइल आणि इराण यांच्यातील तीव्र सैन्य संघर्षामुळे जागतिक विमान वाहतुकीला फटका बसला आहे. पुण्याहून दुबईला दररोज दोन विमाने उड्डाण करतात, मात्र ही दोन्ही आंतरराष्ट्रीय उड्डाण रद्द करण्यात आली आहेत. तसंच दुबईमधून पुण्यात येणारी विमानंही रद्द करण्यात आली आहेत. विमान कंपन्यांनी याबाबतची माहिती प्रवाशांना दिली असून प्रवाशांनी वेळापत्रक तपासूनच विमान प्रवासाचं नियोजन करावं असं आवाहन प्रशासनानं केलं आहे. दरम्यान पुण्यातील इंदिरा स्कूल ऑफ बिझनेस स्टडीजचे एमबीएचे 84 विद्यार्थी आणि 4 शिक्षक दुबईत शैक्षणिक दौऱ्यासाठी गेले होते, त्यांचा परतीचा प्रवास 28 फेब्रुवारी आणि 1 मार्चला नियोजित होता, मात्र पश्चिम आशियातील तीव्र संघर्षामुळे हवाई क्षेत्र बंद झाल्याने ते सर्वजण तिथेच अडकले आहेत.

**निवडणुका**

पुणे जिल्ह्यातील 13 पंचायत समित्यांच्या सभापती आणि उपसभापतींची येत्या 9 मार्च रोजी निवड केली जाणार आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी या निवडीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडीनंतर जवळ जवळ चार वर्षानंतर या पंचायत समित्यांना नवे 'कारभारी' मिळणार आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर बरोबर 1 महिन्याने सभापती आणि उपसभापती निवडले जाणार आहेत. दरम्यान, जिल्हा परिषद निवडणुकीसाठी असलेले तालुकानिहाय निवडणूक निर्णय अधिकारी हेच संबंधित तालुक्याच्या पंचायत समिती सभापती निवडणुकीचे 'पीठासन अधिकारी' म्हणून काम पाहणार आहेत.

**मिनीसरस**

पुणे जिल्हा परिषदेच्या  ग्रामीण विकास यंत्रणा विभागातर्फे येत्या 7 ते ११ मार्च या कालावधीत पुण्यातील कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर 'मिनी सरस:सावित्री जत्रा भरवण्यात येणार आहे. यामध्ये जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या अन्नपदार्थांची चव पुणेकरांना अनुभवता येणार आहे. या जत्रेत जिल्ह्यातील १०० हून अधिक महिला बचत गट सहभागी होणार असल्याचं जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांनी सांगितलं.

**वृक्षतोडीविरुद्ध कारवाई**

होळी सणासाठी बेकायदा वृक्षतोड किंवा झाडांच्या फांद्या तोडल्याची तक्रार आल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

पुणे महानगरपालिकेने याबाबतचा इशारा जारी केला आहे. होळी सणाच्या पार्श्वभूमीवर वृक्ष प्राधिकरण आणि संबंधित अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना महापालिका प्रशासनाने दिल्या आहेत.

**<u>पुणेमनपा</u>**

पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीने शहरी गरीब योजनेत महत्त्वाचा बदल मंजूर केला आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिलेल्या माहितीनुसार, या योजनेचा लाभ घेण्यासाठीची मिळकतकराची अट रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे वार्षिक पाच हजारांपेक्षा अधिक मिळकतकर भरणारे गरजू रुग्णही आता योजनेसाठी पात्र ठरणार आहेत. मात्र उत्पन्न मर्यादा एक लाख साठ हजार रुपये अशीच कायम ठेवण्यात आली आहे. खासगी रुग्णालयातील उपचारांसाठी 50 टक्के खर्च आणि कर्करोग उपचार तसंच डायलिसिससाठी दोन लाखांपर्यंत मदत मिळणार आहे.

**<u>संप</u>**

महाराष्ट्रातील विविध कर, टोल आणि ई-चलन नियमांविरोधात राज्यातील वाहतूक संघटनांनी येत्या पाच मार्चपासून बेमुदत आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. यासाठी 'महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स ॲक्शन कमिटी'ची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती संघटनेच्या वतीनं पुण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

**<u>बाजार समिती</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून 90 ते 100 ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक स्थिर असली तरी घेवडा, बटाटा आणि तोतापुरी कैरीच्या भावात घसरण झाली. पालेभाज्यांची मागणी फारशी नसल्याने भाव खाली आले आहेत. रमजानचा महिना सुरू असल्याने फळ बाजारात सर्वच फळांना मागणी मोठी आहे. धुलीवंदनाच्या दिवशी फुल बाजार बंद असेल, त्यामुळे आज फुल बाजारात मोठ्या प्रमाणावर आवक झाली. मात्र मागणी टिकून असल्याने दर स्थिर आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल 34 आणि किमान 14 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्या कमाल तापमानात आणखी थोडी वाढ होण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**